Epaper

दैनिक जन

सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

। शुक्रवार, दि. ९ ऑक्टोंबर २०२६ । वर्ष १ । अंक १७९ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION



भुसावळच्या मैदानावर युवा खेळाडूंचा दमदार ठसा!

(पान २ वर)

» Selected

निलंबित एपीआयच्या आलिशान गाड्यांवर हायकोर्टाचे सवाल

मुंबई । बडतर्फ सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन वाझे यांच्या जामीन अर्जावर मुंबई उच्च न्यायालयात आज तब्बल तीन तास सुनावणी झाली. या सुनावणीदरम्यान वाझे यांच्याकडे असलेल्या संपत्ती आणि आलिशान गाड्यांवरून न्यायालयाने तपास यंत्रणा आणि पोलीस प्रशासनाला सवाल केले. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. सकाळच्या सत्रात तीन तास सुनावणी झाल्यानंतर न्यायालयाने कामकाज स्थगित केले. जामीन अर्जावर दुपारच्या सत्रात पुन्हा सुनावणी होणार आहे.पुढील भूमिकेकडे लक्ष लागले आहे. सुनावणीदरम्यान सचिन वाझे वापरत असलेल्या महागड्या गाड्यांचा मुद्दा उपस्थित झाला. त्यावेळी न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांनी वाझे यांच्या मर्सिडीज वापराबाबत प्रश्न उपस्थित केला.

; 'नटसम्राट' काळाच्या पडद्याआड;हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने वयाच्या ७५व्या वर्षी अखेरचा श्वास

असा नट होणे नाही... नाना पाटेकर अनंतात विलीन!

डोणजेतील फार्महाऊसवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार, कलाविश्वावर शोककळा

जन सम्राट टाईम्स

पुणे | मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील आपल्या दमदार अभिनयाने, परखड व्यक्तिमत्त्वाने आणि संवेदनशील सामाजिक जाणिवेने लाखो रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर अनंतात विलीन झाले. वयाच्या ७५व्या वर्षी गोव्यात हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचे निधन झाले.

त्यांच्या आकस्मिक निधनाने मराठीसह हिंदी चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे.नाना पाटेकर यांचे पार्थिव वैद्यकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुण्याकडे आणण्यात आले. पुण्याजवळील डोणजे येथील त्यांच्या फार्महाऊसशी त्यांचे विशेष जिव्हाळ्याचे नाते होते. याच ठिकाणी त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. कुटुंबीय, राजकीय नेते, कलाकार आणि चाहत्यांनी त्यांना भावपूर्ण निरोप दिला. नाना पाटेकर हे गोव्यातील डोना पाउला येथील निवासस्थानी होते. गुरुवारी पहाटे त्यांची प्रकृती अचानक बिघडली. ते बेशुद्ध अवस्थेत आढळल्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी सुमारे ४५ मिनिटे सीपीआर देऊन त्यांना वाचविण्याचे प्रयत्न केले; मात्र उपचारांना प्रतिसाद न मिळाल्याने



सकाळी सुमारे ५.२० वाजता त्यांना मृत घोषित करण्यात आले.

नाना पाटेकर यांनी मराठी रंगभूमीपासून आपल्या अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली. पुढे हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीत त्यांनी आपल्या अभिनयाची स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांच्या संवादफेकीतील धार, भूमिकेतील जीवंतपणा आणि व्यक्तिरेखेला दिलेली अस्सल छटा यामुळे ते इतरांपेक्षा वेगळे ठरले. 'परिंदा', 'क्रांतिवीर', 'नटसम्राट', 'वेलकम' यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या भूमिका आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहेत. गंभीर, संवेदनशील, खलनायकीपासून विनोदी व्यक्तिरेखांपर्यंत त्यांनी विविध छटांच्या भूमिका समर्थपणे साकारल्या. त्यांच्या अभिनयासाठी त्यांना तीन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांसह अनेक मान-सन्मान मिळाले. नाना पाटेकर यांची ओळख केवळ अभिनेता म्हणून नव्हती. सामाजिक प्रश्नांबाबत त्यांची भूमिका नेहमीच ठाम राहिली. मकरंद अनासपुरे यांच्यासोबत त्यांनी 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून शेतकरी आणि दुष्काळग्रस्त कुटुंबांसाठी विविध उपक्रम राबविले. पाणी, शेती आणि ग्रामीण भागातील प्रश्नांवर त्यांनी प्रत्यक्ष काम केले.

त्यांच्या आकस्मिक निधनाने मराठीसह हिंदी चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे.नाना पाटेकर यांचे पार्थिव वैद्यकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुण्याकडे आणण्यात आले. पुण्याजवळील डोणजे येथील त्यांच्या फार्महाऊसशी त्यांचे विशेष जिव्हाळ्याचे नाते होते. याच ठिकाणी त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. कुटुंबीय, राजकीय नेते, कलाकार आणि चाहत्यांनी त्यांना भावपूर्ण निरोप दिला. नाना पाटेकर हेडोना पाउला येथील निवासस्थानी होते. गुरुवारी पहाटे त्यांची प्रकृती अचानक बिघडली. ते बेशुद्ध अवस्थेत आढळल्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांना प्रतिसाद न मिळाल्याने सकाळी सुमारे ५.२० वाजता त्यांना मृत घोषित करण्यात आले.

अखेरचा निरोप देताना कलाविश्व भावुक

नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी समोर येताच कलाकार, राजकीय नेते, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि चाहत्यांकडून शोक व्यक्त करण्यात आला. त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी अभिनेते मकरंद अनासपुरे यांनाही अश्रू अनावर झाले. नाना पाटेकर यांचा मुलगा मल्हार पाटेकर आणि पत्नी निलकांती पाटेकर यांच्यासह कुटुंबीय यावेळी भावूक झाले. 'नटसम्राट'ची रंगभूमीवरील गर्जना आता कायमची शांत झाली असली, तरी त्यांच्या भूमिका, संवाद आणि अभिनयाचा ठसा भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात कायम जिवंत राहणार आहे. असा नट होणे नाही...!

प्रसूतिपूर्व लिंगनिदान आणि भ्रूणहत्येला लवकरच लागणार लगाम!

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: प्रसूतीपूर्व लिंगनिदान आणि स्त्रीभ्रूणहत्येच्या प्रकरणांमध्ये संघटितपणे काम करणाऱ्या व्यक्ती आणि यंत्रणांवर कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने पावले उचलली आहेत. अशा प्रकरणांमध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोका) लागू करता यावा, यासाठी गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा, १९९४ कायद्यात आवश्यक सुधारणा करणारे विधेयक आगामी हिवाळी अधिवेशनात मांडण्याचे संकेत आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. पीसी अँन्ड पीएनडीटी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या टास्क फोर्सची पहिली बैठक बुधवारी मंत्रालयात झाली. या बैठकीत जिल्हानिहाय तपासणी मोहीम, संशयित प्रकरणांचा तपास, सोनोग्राफी केंद्रांच्या नोंदींची पडताळणी आणि कायद्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी दूर करण्याबाबत आढावा घेण्यात आला. टास्क फोर्सच्या अध्यक्ष आमदार डॉ. नीलम गोहे, सदस्य आमदार मनीषा कायंदे, उमा खापरे, स्नेहा दुबे तसेच आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, संचालक विजय कंदेवाड आणि अतिरिक्त संचालक संदीप सांगळे बैठकीला उपस्थित होते. लिंगनिदान आणि स्त्रीभ्रूणहत्येच्या प्रकरणांत वैयक्तिक आरोपींवर कारवाई करण्याबरोबरच या प्रकारामागील संपूर्ण साखळीचा शोध घेण्याची गरज असल्याचे आबिटकर यांनी सांगितले.

त्यासाठी उपलब्ध माहितीच्या आधारे कारवाई करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई



करण्याचे निर्देश त्यांनी दिले. पीसी अँन्ड पीएनडीटी कायद्यात आवश्यक सुधारणा करण्याची कार्यवाही सुरू करण्याचेही त्यांनी स्पष्ट केले.टास्क फोर्सकडून जिल्ह्यांची जोखीम आणि उपलब्ध माहितीच्या आधारे निवड करून विशेष तपासणी मोहीम राबवली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात पालघर, अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यांमध्ये समिती भेट देऊन तपासणी करणार आहे. त्यानंतर पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रातील संशयित किंवा संवेदनशील जिल्ह्यांमध्ये तपासणीचा विस्तार केला जाणार आहे. सोनोग्राफी केंद्रांच्या नोंदी, मशीनचा वापर, तपासण्यांची माहिती आणि संबंधित कागदपत्रांची पडताळणी करण्यात येणार आहे. प्रसूतीपूर्व लिंगनिदान आणि स्त्रीभ्रूणहत्येच्या प्रकरणांमध्ये संघटितपणे काम करणाऱ्या व्यक्ती आणि यंत्रणांवर कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने पावले उचलली आहेत. अशा प्रकरणांमध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोका) लागू करता यावा, यासाठी गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा, १९९४ कायद्यात आवश्यक सुधारणा करणारे विधेयक आगामी हिवाळी अधिवेशनात मांडण्याचे संकेत आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. पीसी अँन्ड पीएनडीटी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या टास्क फोर्सची पहिली बैठक बुधवारी मंत्रालयात झाली. या बैठकीत जिल्हानिहाय तपासणी मोहीम, संशयित प्रकरणांचा तपास, सोनोग्राफी केंद्रांच्या नोंदींची पडताळणी आणि कायद्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी दूर करण्याबाबत आढावा घेण्यात आला.अध्यक्ष आमदार डॉ. नीलम गोहे, सदस्य आमदार मनीषा कायंदे, उमा खापरे, स्नेहा दुबे तसेच आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, संचालक विजय कंदेवाड आणि अतिरिक्त संचालक संदीप सांगळे बैठकीला उपस्थित होते.

त्र्यंबकेश्वर मंदिर दोन महिने बंद; सिंहस्थ कुंभमेळ्याआधी प्रशासनाचा निर्णय

जन सम्राट टाईम्स

नाशिक। प्रतिनिधी: नाशिकमधील श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर मंदिर हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. दररोज हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात. मात्र, आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर मंदिराबाबत मोठा निर्णय घेण्यात येत आहे. संभाव्य नियोजनानुसार येत्या १५ किंवा १६ ऑक्टोबरपासून त्र्यंबकेश्वर मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी बंद ठेवण्यात येणार आहे. कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्ट आणि जिल्हा प्रशासनाला दिलेल्या सूचनांनुसार हे नियोजन करणार असल्याची माहिती समोर येत आहे.मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर विकासकामे आणि गर्दीचे नियोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे काम सुरू असताना मोठ्या संख्येने भाविक मंदिरात दाखल झाल्यास सुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. यामुळे अपघात किंवा चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती टाळण्यासाठी मंदिर काही काळ बंद ठेवण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती सांगण्यात येत आहे.दरम्यान, सध्या पितृपक्षामुळे त्र्यंबकेश्वरमध्ये देशाच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक दाखल होत आहेत. पितृकर्म आणि धार्मिक विधींसाठी येणाऱ्या भाविकांमुळे मंदिर परिसरात मोठी गर्दी होत आहे. तसेच,



शनिवार-रविवारच्या सुट्ट्यांमुळे गर्दीत आणखी वाढ झाली आहे. त्यामुळे प्रशासनावरील ताण कमी करण्यासाठी तसेच, भाविकांना दर्शन घेतला कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी १२ ऑक्टोबरपर्यंत सर्व प्रकारचे व्हीआयपी दर्शन बंद ठेवण्यात आले आहे.भाविकांसाठी मंदिराचे प्रवेशद्वार बंद असले तरी श्री त्र्यंबकेश्वराची धार्मिक परंपरा मात्र खंडित होणार नसल्याचे सांगितले जात आहे. मंदिरातील नित्यपूजा, त्रिकाल पूजा तसेच इतर पारंपरिक धार्मिक विधी हे नेहमीप्रमाणे सुरू राहणार आहेत. त्यामुळे भाविकांना प्रत्यक्ष दर्शन घेता येणार नसले, तरी मंदिरातील दैनंदिन धार्मिक विधी नियमितपणे पार पडणार आहेत. तसेच, मंदिर बंद ठेवण्याची अंतिम तारीख आणि कालावधी याबाबत देवस्थान ट्रस्टकडून अधिकृत घोषणा केली जाणार आहे.आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी त्र्यंबकेश्वर शहर आणि मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर विकासकामे प्रस्तावित आहेत. रस्ते विस्तारीकरण, पायाभूत सुविधा आणि गर्दी व्यवस्थापनाशी संबंधित कामांना या काळात वेग देण्यात येणार आहे.मंदिर काही काळ भाविकांसाठी बंद असल्याने विकासकामे आणि आवश्यक नियोजन अधिक सुरक्षितपणे करता येणार असल्याचे प्रशासनाचे नियोजन आहे. त्र्यंबकेश्वरमध्ये कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर मोठ्या संख्येने भाविक येण्याची शक्यता आहे. त्यामुळे आतापासूनच गर्दी नियंत्रण, वाहतूक व्यवस्था, सुरक्षा आणि पायाभूत सुविधांची तयारी करण्यावर प्रशासनाचा भर आहे.

सोन्याच्या दरात पुन्हा बदल!

नाशिक : भारतात 9 ऑक्टोबर रोजी 24 कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर 14,956 रुपये, 22 कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर 13,709 रुपये आणि 18 कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर 11,217 रुपये आहे. 22 कॅरेट सोन्याच्या नागपूर शहरात आज 22 कॅरेट सोन्याच्या प्रति 10 ग्रॅमचा दर 1,37,090 रुपये, 24 कॅरेट सोन्याच्या प्रति 10 ग्रॅमचा दर 1,49,560 रुपये आणि 18 कॅरेट सोन्याच्या प्रति 10 ग्रॅमचा दर 1,12,170 रुपये आहे. चेन्नई शहरात आज 22 कॅरेट सोन्याच्या प्रति 10 ग्रॅमचा दर 1,37,090 रुपये, 24 कॅरेट सोन्याच्या प्रति 10 ग्रॅमचा दर 1,49,560 रुपये आणि 18 कॅरेट सोन्याच्या प्रति 10 ग्रॅमचा दर 1,12,640 रुपये आहे.

सीमापुरी इमारत अपघातात आतापर्यंत चौघांचा मृत्यू!

जन सम्राट टाईम्स

दिल्ली| प्रतिनिधी: पूर्व दिल्लीच्या सीमापुरी परिसरातील इमारत अपघातात (Delhi Accident) आतापर्यंत चौघांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. मृतांमध्ये 21 वर्षीय गुलाफ्शा, 56 वर्षीय हजा बीबी, 33 वर्षीय नूसरा व चार वर्षीय एका मुलाचा मृतदेह बचाव पथकाच्या हाती लागले आहे. दरम्यान, लहान मुलाची ओळख अद्याप पटू शकलेली नाही. दिल्ली पोलिसांच्या माहितीनुसार, बचाव कार्याच्या दरम्यान मातीच्या ढिगाऱ्यातून शरीराचे काही भाग व मानवी अवशेष सापडले. त्यांचीही ओळख अद्याप झालेली नाही. डीएनएच्या माध्यमातून त्यांची ओळख करावी लागणार आहे. या घटनेच्या संदर्भात विशिष्ट कायद्याच्या कलमांतर्गत सीमापुरी पोलीस स्टेशनमध्ये 8 ऑक्टोबरला एफआयआर दाखल करण्यात आली आहे. पोलीस या प्रकरणाचा कसून तपास करत आहेत. इमारत कोसळण्याचे कारणही शोधले जात आहे. अधिकाऱ्यांच्या मते, घटनास्थळावरील बचाव मोहिम आता पूर्णपणे थांबवण्यात आली आहे. ढिगाऱ्याखालून मिळालेले अवशेष आता फॉरेन्सिक तपासासाठी व इतर पैल्लूंच्या पडताळणीसाठी पाठवण्यात आले आहेत.दरम्यान, दिल्लीच्या सीमापुरी परिसरात बुधवारी पाच मजल्यांची एक इमारत कोसळल्याची घटना घडली होती. एका वृत्तंसस्थेशी संवाद साधताना शाहदराचे पोलीस आयुक्त राजेंद्र प्रसाद मीणा यांनी सांगितले की, आतापर्यंत सात जणांचा जीव वाचवण्यास बचाव पथकाला यश आले आहे. त्याआधी नॉर्थ ईस्ट दिल्लीचे जिल्हाधिकारी अजय कुमार यांनी पत्रकारांना सांगितले होते की, प्राथमिक माहितीनुसार, ही इमारत बुधवारी दुपारी 3 ते 3.15 च्या सुमारास



कोसळली. आम्हाला 3.25 ला कॉल आला, ज्यात लोकेशन व व्हिडीओद्वारे माहिती देण्यात आलेली.तसेच अजय कुमार हे डिस्ट्रिक्ट डिजास्टर मॅनेजमेंट अथॉरिटी (डीडीएमए)चे प्रभारी देखील आहेत. ते म्हणाले की, या घटनेची माहिती तातडीने डीडीएमए आणि एनडीआरएफच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आली. त्यांना तातडीने घटनास्थळी बोलावण्यात आले. त्याचमुळे काही जणांचे प्राण आम्हाला वाचवता आले.पूर्व दिल्लीच्या सीमापुरी परिसरातील इमारत अपघातात (Delhi Accident) आतापर्यंत चौघांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. मृतांमध्ये 21 वर्षीय गुलाफ्शा, 56 वर्षीय हजा बीबी, 33 वर्षीय नूसरा व चार वर्षीय एका मुलाचा मृतदेह बचाव पथकाच्या हाती लागले आहे. दरम्यान, लहान मुलाची ओळख अद्याप पटू शकलेली नाही. दिल्ली पोलिसांच्या माहितीनुसार, बचाव कार्याच्या दरम्यान मातीच्या ढिगाऱ्यातून शरीराचे काही भाग व मानवी अवशेष सापडले. त्यांचीही ओळख अद्याप झालेली नाही. डीएनएच्या माध्यमातून त्यांची ओळख करावी लागणार आहे. या घटनेच्या संदर्भात विशिष्ट कायद्याच्या कलमांतर्गत सीमापुरी पोलीस स्टेशनमध्ये 8 ऑक्टोबरला एफआयआर दाखल करण्यात आली आहे. पोलीस या प्रकरणाचा कसून तपास करत आहेत. इमारत कोसळण्याचे कारणही शोधले जात आहे. अधिकाऱ्यांच्या मते, घटनास्थळावरील बचाव मोहिम आता पूर्णपणे थांबवण्यात आल.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

महाराष्ट्रातील दुष्काळाची केंद्राकडून पाहणी सुरु

११ ऑक्टोबरला अंतिम आढावा; ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान केंद्रीय पथकाचा दौरा !

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: महाराष्ट्रातील काही भागांत पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीचा आणि खरीप हंगामातील पिकांच्या नुकसानीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी केंद्र सरकारचे आंतरमंत्रालयीन पथक महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहे. ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या या दौऱ्यात पावसाची स्थिती, पीक नुकसान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जनावरांचा चारा तसेच शेतकरी आणि ग्रामीण भागातील परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली जाणार आहे. केंद्राच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली हे पथक आले आहे. कृषी, जलसंपदा, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, अन्न व सार्वजनिक वितरण, पशुसंवर्धन, अर्थ विभाग, नीती आयोग यांसह विविध केंद्रीय विभागांतील प्रशासकीय व तांत्रिक अधिकाऱ्यांचा पथकात समावेश आहे. केंद्रीय पथकाच्या मुंबईतील आगमनानंतर सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली. यावेळी राज्य सरकारच्या विविध विभागांनी महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीचे सविस्तर सादरीकरण केले. पावसाची कमतरता, निर्माण झालेली पाणीटंचाई, संभाव्य टँकरची गरज, शेतीवर अवलंबून असलेले शेतमजूर व जमीनधारकांचे प्रश्न, मजुरांचे संभाव्य स्थलांतर आणि शेतकरी आत्महत्यांसारख्या गंभीर बाबींकडे केंद्रीय पथकाचे लक्ष वेधण्यात आले. मदत व पुनर्वसन विभागाच्या वतीने राज्यातील पावसाची स्थिती, हवामानातील बदलांचा परिणाम



आणि शेतीपिकांच्या नुकसानीची माहिती सादर करण्यात आली. कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह आणि आयुक्त सुरज मांढरे यांनी पिकांच्या नुकसानीची तसेच जिल्हानिहाय परिस्थितीची माहिती केंद्रीय पथकासमोर मांडली. पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी जनावरांच्या चाऱ्याची सद्यस्थिती आणि आगामी सात महिन्यांतील संभाव्य परिस्थितीचा आढावा दिला.कमी पावसाचा परिणाम पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवरही झाला आहे. सध्या टँकरद्वारे सुरू असलेला पाणीपुरवठा, मागील तीन वर्षांतील पाण्याची स्थिती आणि टँकरची गरज भासू शकणाऱ्या गावांची माहिती पाणीपुरवठा विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन तसेच भूजल सर्वेक्षण व विकास आयुक्त रवींद्र खेबुडकर यांनी सादर केली. जलसंपदा, जलसंधारण, रोजगार हमी आणि ऊर्जा विभागाकडूनही सद्यस्थिती तसेच आगामी सात महिन्यांतील संभाव्य परिस्थितीची माहिती देण्यात आली. लघुपाटबंधारे तलाव, गावांतील पाण्याचे स्रोत आणि त्यांची सद्यस्थिती यांचाही आढावा घेण्यात आला.

प्रत्यक्ष पाहणीनंतर केंद्राकडे अहवाल

राज्य सरकारने सादर केलेली आकडेवारी आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे केंद्रीय पथकाने प्रत्यक्ष पाहणीचे नियोजन केले आहे. पथकातील अधिकारी विविध जिल्ह्यांत जाऊन पीक नुकसान, पाणीटंचाई, चारा उपलब्धता आणि दुष्काळाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम याची पाहणी करणार आहेत. स्थानिक अधिकारी, तज्ज्ञ आणि राज्य शासनाच्या संबंधित विभागांचे अधिकारीही या पाहणीदरम्यान उपस्थित राहणार आहेत. विविध पथकांच्या माध्यमातून जास्तीत जास्त क्षेत्राचा आढावा घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. प्रत्यक्ष पाहणी पूर्ण झाल्यानंतर केंद्रीय पथक मुंबईत परतणार असून ११ ऑक्टोबर रोजी दुष्काळी परिस्थितीबाबत पुढील सविस्तर चर्चा होणार आहे. या दौऱ्यामुळे महाराष्ट्रातील दुष्काळाची प्रत्यक्ष वस्तुस्थिती, शेतीपिकांचे नुकसान आणि पाणीटंचाईची तीव्रता केंद्र सरकारसमोर अधिक स्पष्टपणे मांडली जाणार असून, पुढील मदत व उपाययोजनांच्या दृष्टीने या अहवालाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

भुसावळच्या मैदानावर युवा खेळाडूंचा दमदार ठसा!

प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

जन सम्राट टाईम्स

भुसावळ। प्रतिनिधी: सेवा संकल्प अभियानांतर्गत आयोजित शासकीय शालेय तालुकास्तरीय मैदानी स्पर्धांमध्ये भुसावळ तालुक्यातील युवा खेळाडूंनी आपल्या कौशल्याचा दमदार ठसा उमटविला. बियाणी मिलिटरी स्कूलच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विविध क्रीडा प्रकारांत प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. क्रीडा व युवा सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, जळगाव, पंचायत समिती भुसावळ आणि भुसावळ नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. भुसावळ तालुक्यातील विविध शाळांमधील १४, १७ आणि १९ वर्षांखालील मुला-मुलींनी यात सहभाग घेतला. धावणे, अडथळा शर्यत, लांब उडी, उंच उडी, गोळाफेक, थाळीफेक, हातोडाफेक, चालणे आणि ४×१०० मीटर रिले अशा विविध क्रीडा प्रकारांत खेळाडूंनी उत्साहाने सहभाग नोंदवत आपली क्रीडाक्षमता सिद्ध केली. संजय सावकारे यांच्या हस्ते मुलांच्या स्पर्धांचे उद्घाटन मुलांच्या स्पर्धांचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय भाऊ सावकारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गटविकास अधिकारी डॉ. कुलदीप ठाकरे, तालुका क्रीडा अधिकारी डॉ. नितीन जंगम, संस्थेचे अध्यक्ष मनोज बियाणी आणि सचिव डॉ. संगीता बियाणी उपस्थित होते.



मुलींच्या स्पर्धांचे उद्घाटन भुसावळ नगरपरिषदेच्या प्रभारी नगराध्यक्ष शैलेजा नारखेडे यांच्या हस्ते झाले. यावेळी बियाणी एज्युकेशन संस्थेच्या सचिव डॉ. संगीता बियाणी, संचालिका स्मिता बियाणी, प्राचार्य डी. एम. पाटील, महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे राज्य उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष डॉ. प्रदीप साखरे यांच्यासह क्रीडा शिक्षक, पंच, शिक्षक आणि स्वयंसेवक उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व मैदान पूजन करण्यात आले. त्यानंतर क्रीडा मशाल प्रज्वलित करून स्पर्धांना सुरुवात झाली. उद्घाटनानंतर १०० मीटर धावण्याची स्पर्धा घेण्यात आली. खेळातून शिस्त, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व विकास उद्घाटनप्रसंगी बोलताना मंत्री संजय सावकारे यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात खेळाचे महत्त्व अधोरेखित केले.

खेळामुळे सांघिक भावना, आत्मविश्वास आणि शारीरिक तंदुरुस्ती वाढते. विद्यार्थ्यांनी मेहनत, सातत्य व शिस्त यांना प्राधान्य द्यावे. तसेच स्वच्छतेची काळजी घेऊन मोबाईलच्या अतिवापरापासून दूर राहावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रभारी नगराध्यक्ष शैलेजा नारखेडे यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी खेळाकडे करिअरची संधी म्हणून पाहावे आणि निरोगी आरोग्यासाठी नियमितपणे खेळांमध्ये सहभागी व्हावे, असे त्यांनी सांगितले. जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी खेळाडू सज्ज विविध क्रीडा प्रकारांत प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या खेळाडूंचा गौरव करण्यात आला. तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्यामुळे निवड झालेल्या खेळाडूंना आता जिल्हास्तरावर आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करण्याची संधी मिळणार आहे. नियोजनबद्ध आयोजनामुळे स्पर्धा यशस्वी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा शिक्षक, पंच, आयोजक, शिक्षक आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. मैदान व्यवस्था, खेळाडूंची नोंदणी, स्पर्धांचे नियोजन, पंचांचे कामकाज आणि निकाल प्रक्रिया सुरळीत पार पडली. त्यामुळे संपूर्ण स्पर्धा शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाली. या स्पर्धांमुळे भुसावळ तालुक्यातील शालेय खेळाडूंना आपली गुणवत्ता दाखविण्यासाठी व्यासपीठ मिळाले. जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंकडून आता उत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा व्यक्त होत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विलास पाटील यांनी केले.

संपादकीय

लोकसेवा आणि दळभद्री राजकारण !

लोकसेवा आयोग म्हणजे केवळ परीक्षा घेणारी यंत्रणा नाही, तर महाराष्ट्राच्या प्रशासकीय व्यवस्थेचा कणा घडविणारी संस्था आहे. या आयोगाच्या परीक्षांमधून अधिकारी होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा प्रश्न त्याच्याशी जोडलेला आहे.

वर्षानुवर्षे अभ्यास, आर्थिक ओढाताण, कुटुंबाच्या अपेक्षा आणि भविष्याची अनिश्चितता यांचा सामना करीत विद्यार्थी स्पर्धा परीक्षांची तयारी करतात. अशा परिस्थितीत परीक्षांच्या वेळापत्रकाबाबत अनिश्चितता, प्रक्रियेतील कथित गैरव्यवहार, पेपरफुटीच्या तक्रारी आणि प्रशासकीय निर्णयांबाबत संशय निर्माण होत असेल, तर विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारायचे तरी कुणाला? पुण्यात सुरू असलेले एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन हा केवळ रस्त्यावरचा संघर्ष नाही; तो व्यवस्थेच्या विश्वासार्हतेची परीक्षा आहे. मात्र, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना न्याय देण्याऐवजी या आंदोलनातून राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न होत असेल, तर तोही तितकाच गंभीर विषय आहे. विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून राजकीय हिशेब चुकते करण्याचा अधिकार कुणालाही नाही. विद्यार्थ्यांचे प्रश्न हे कोणत्याही एका पक्षाची मक्तेदारी नाहीत. ते सत्ताधारी, विरोधक, मंत्री, आमदार किंवा सामाजिक कार्यकर्त्यांच्या वैयक्तिक प्रसिद्धीचे साधनही नाहीत. एमपीएससीचे विद्यार्थी काही गुरेढोरे नाहीत की कुणीही यावे आणि त्यांना आपल्या राजकीय दिशेने हाकत न्यावे! त्यांना स्वतःची बुद्धी आहे, विवेक आहे आणि आल्या भविष्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकारही आहे. मागण्या केवळ घोषणा समजून दुर्लक्ष करू नका! एमपीएससी विद्यार्थ्यांच्या मागण्या तपासल्या, तर त्यामागे असलेली अस्वस्थता स्पष्ट होते. आयोगाच्या अध्यक्षांचा राजीनामा किंवा त्यांच्या कारभाराची निष्पक्ष चौकशी, रिक्त पदांची मेगाभरती, पेपरफुटी आणि गैरव्यवहार रोखण्यासाठी कठोर कायदा, परीक्षा पद्धतीतील बदलांबाबत स्पष्टता, सचिवांची बदली आणि कागदपत्रांच्या वारंवार मागणीऐवजी एकसंध यंत्रणा उभारणे, अशा विविध मुद्द्यांवर विद्यार्थी आवाज उठवत आहेत. सुमारे ७० हजार किंवा त्यापेक्षा अधिक रिक्त पदांच्या भरतीची मागणी करताना नेमकी किती पदे रिक्त आहेत, त्यापैकी कोणती पदे भरतीसाठी मंजूर आहेत आणि भरतीचे वेळापत्रक काय असेल, याबाबत सरकारने अधिकृत आकडेवारीसह स्पष्टता देणे आवश्यक आहे. मोठ्या भरतीची घोषणा करून विद्यार्थ्यांना आश्वासनांच्या भूलभुलैय्यात ठेवणे सोपे आहे; परंतु जाहिरात, परीक्षा, निकाल आणि नियुक्ती या प्रत्येक टप्प्यावर वेळेचे बंधन पाळणे ही खरी कसोटी आहे. पेपरफुटी किंवा परीक्षेतील गैरप्रकारांबाबत तक्रार झाली, तर तिची निष्पक्ष चौकशी व्हायला हवी. दोषी कोणत्याही पदावर असो, त्याच्यावर कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे. त्याचवेळी पुराव्याआधी कोणालाही दोषी ठरविणेही योग्य नाही. विद्यार्थ्यांना केवळ चौकशीचे आश्वासन नको, तर चौकशीची प्रक्रिया, कालमर्यादा आणि निष्कर्ष याबाबत पारदर्शक माहिती हवी. परीक्षेतील विश्वास हा भाषणांनी निर्माण होत नाही; तो निष्पक्ष आणि वेळेत झालेल्या निर्णयांतून निर्माण होतो. अध्यक्षांचा प्रश्न आणि सरकारची जबाबदारी आयोगाच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी ही आंदोलनातील प्रमुख मागण्यांपैकी एक आहे. मात्र, अध्यक्षांना हटविण्याचा अधिकार नेमका कोणत्या प्राधिकरणाकडे आहे, कोणती कायदेशीर प्रक्रिया लागू होते आणि चौकशी कोण करू शकते, हे स्पष्ट होणे गरजेचे आहे. सरकारने कायद्याच्या मर्यादा सांगून जबाबदारी झटकू नये; तसेच कायद्याने अधिकार नसताना निर्णय घेण्याचे आश्वासनही देऊ नये. जर अध्यक्षांच्या कारभाराबाबत गंभीर तक्रारी असतील, तर त्यांची निष्पक्ष चौकशी करण्यासाठी कोणती वैधानिक यंत्रणा उपलब्ध आहे, याची माहिती सरकारने विद्यार्थ्यांना द्यावी. चौकशीची मागणी मान्य झाली असेल, तर तिचे स्वरूप, कार्यकक्षा आणि कालमर्यादा जाहीर करावी.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

दिनेश वाघमारे यांची प्रागतिक विचारमंचने घेतली सदिच्छा भेट



जन सम्राट टाईम्स

भुसावळ|प्रतिनिधी: महाराष्ट्राचे राज्य निवडणूक आयुक्त दिनेश टी. वाघमारे शासकीय दौऱ्यानिमित्त जळगाव येथे आले असता, भुसावळ येथे प्रागतिक विचारमंचच्या वतीने त्यांची सदिच्छा भेट घेण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे किशोर मेढे यांचीही उपस्थिती होती. भेटीदरम्यान विविध सामाजिक, प्रशासकीय तसेच निवडणूक प्रक्रियेशी संबंधित विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या वेळी प्रागतिक विचारमंचाचे प्रा. डॉ. जतीन मेढे, अध्यक्ष जे. पी. सपकाळे, हृदयरोग तज्ज्ञ डॉ. राजेश मानवतकर, राज्य पत्रकार संघटनेचे भुसावळ तालुका अध्यक्ष संघरत्न सपकाळे, साहित्यिक व लेखक अ. फ. भालेराव, देवेंद्र तायडे, समाधान जाधव, बच्छाव सर, प्रा. डॉ. सुनील नेवे, नागेश्वर साळवे, सुधाकर सनांसे आदी उपस्थित होते. प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव दिनेश टी. वाघमारे हे महाराष्ट्र केडरच्या १९९४च्या आयएएस तुकडीतील अधिकारी असून, महाराष्ट्राचे सातवे राज्य निवडणूक आयुक्त म्हणून त्यांनी २८ जानेवारी २०२५ रोजी पदभार स्वीकारला. यापूर्वी त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या अतिरिक्त मुख्य सचिव पदावर काम केले आहे. वाघमारे यांनी आपल्या प्रशासकीय कारकिर्दीत राज्यातील विविध महत्त्वाच्या पदांवर जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. त्यांनी अतिरिक्त मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषध विभाग; प्रधान सचिव, गृह (अपील व सुरक्षा) विभाग; प्रधान सचिव, ऊर्जा विभाग; अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी (MSETCL); प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग अशा पदांवर काम केले आहे. तसेच त्यांनी महानगरपालिका आयुक्त, पिंपरी-चिंचवड व नवी मुंबई; व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषी-उद्योग विकास महामंडळ (MAIDC); विभागीय आयुक्त, अमरावती; सदस्य सचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, नागपूर; अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नागपूर; व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ (MSSIDC); अध्यक्ष, नागपूर सुधार ट्रस्ट (NIT); जिल्हाधिकारी, बुलढाणा; मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ व वाशिम; सहायक जिल्हाधिकारी, रत्नागिरी आदी पदांवरही काम केले आहे. विविध पुरस्कारांनी सन्मान प्रशासकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल दिनेश वाघमारे यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यामध्ये ऊर्जा क्षेत्रातील स्कोच सुवर्ण पुरस्कार, नवभारत प्रशासन पुरस्कार, CSR India 2021 पुरस्कार, डिजिटल परिवर्तनासाठी PSU पुरस्कार, GreenTech Leading Director Award 2021 तसेच साक्षरोत्तर अभियानासाठी सत्येन मैत्रा राष्ट्रीय पुरस्कार यांचा समावेश आहे.

टिटवी विद्यालयाच्या मुलींच्या खो-खो संघाचे तालुकास्तरीय विजेतेपद

१४ वर्षांखालील गटात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन

जन सम्राट टाईम्स

टिटवी । प्रतिनिधी: शासकीय तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टिटवीच्या १४ वर्षांखालील मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तालुकास्तरीय विजेतेपद पटकावले. पारोळा येथील एन. ई. एस. गर्ल्स हायस्कूलच्या मैदानावर उत्साहपूर्ण वातावरणात ही स्पर्धा पार पडली. अंतिम सामन्यात टिटवी विद्यालयाच्या संघाचा सामना एन. ई. एस. गर्ल्स हायस्कूल, पारोळा संघाशी झाला. अंतिम सामन्यात दोन्ही संघांनी विजयासाठी जोरदार प्रयत्न केले. सुरुवातीपासूनच सामना चुरशीचा राहिला.

मात्र, टिटवीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट समन्वय, वेग, चपळता आणि क्रीडा कौशल्याचा प्रभावी वापर करत प्रतिस्पर्धी संघावर मात केली. संघातील खेळाडूंनी सांघिक खेळाचे उत्तम प्रदर्शन करत निर्णायक क्षणी आक्रमक व बचावात्मक डावपेचांचा योग्य वापर केला. त्यांच्या या



उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर टिटवी विद्यालयाच्या संघाने तालुकास्तरीय विजेतेपदावर आपले नाव कोरले. या विजयामुळे टिटवी विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विजेत्या संघातील खेळाडू तसेच क्रीडा शिक्षकांचे सर्वत्र कौतुक होत आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा टिटवी विद्यालयाच्या मुलींच्या संघाने मिळविलेल्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब पाटील, सचिव, मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले. तसेच आगामी जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेसाठी संघाला शुभेच्छा दिल्या. शासकीय तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टिटवीच्या १४ वर्षांखालील मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तालुकास्तरीय विजेतेपद पटकावले. पारोळा येथील एन. ई. एस. गर्ल्स हायस्कूलच्या मैदानावर उत्साहपूर्ण वातावरणात ही स्पर्धा पार पडली. अंतिम सामन्यात टिटवी विद्यालयाच्या संघाचा सामना एन. ई. एस. गर्ल्स हायस्कूल, पारोळा संघाशी झाला. अंतिम सामन्यात दोन्ही संघांनी विजयासाठी जोरदार प्रयत्न केले. सुरुवातीपासूनच सामना चुरशीचा राहिला. मात्र, टिटवीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट समन्वय, वेग, चपळता आणि क्रीडा कौशल्याचा प्रभावी वापर करत प्रतिस्पर्धी संघावर मात केली.

निंभोरा पोलिसांची मोठी कारवाई; ५.४२ लाखांचा गुटखा-पानमसाला जप्त

निंभोरा : रावेर तालुक्यातील निंभोरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत वडगाव फाट्याजवळ पोलिसांनी कारवाई करत सुगंधित पानमसाला, गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांचा एकूण ५ लाख ४२ हजार ५२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यापैकी दोघांना अटक करण्यात आली आहे. ही कारवाई ७ ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटे ५.४५ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली. या प्रकरणी जळगाव येथील अन्न सुरक्षा अधिकारी योगराज किशोर सूर्यवंशी यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून निंभोरा पोलिस ठाण्यात संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणात आझिम तैय्यब सय्यद (वय २३), शेख मुबश्शीर कासिम (वय २३) आणि मध्य प्रदेशातील नितू शेख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी आरोपी क्रमांक एक आणि दोन यांना अटक करण्यात आल्याची माहिती पोलिस नोंदीत नमूद आहे.

काँग्रेसच्या ठिय्या आंदोलनाची तातडीने दखल!

जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी: जिल्हा शासकीय रुग्णालयातील मागील काही महिन्यांपासून बंद असलेली CT Scan मशीनची सेवा अखेर सुरू करण्यात आली आहे. काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आलेल्या ठिय्या आंदोलनाची तसेच निवेदनाद्वारे केलेल्या पाठपुराव्याची प्रशासनाने तातडीने दखल घेतल्याचे काँग्रेसकडून सांगण्यात आले. CT Scan सेवा पूर्ववत झाल्यामुळे सर्वसामान्य, गरीब आणि गरजू



रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. जिल्हा शासकीय रुग्णालयातील CT Scan सेवा बंद असल्याने गंभीर आजार, अपघात, डोक्याला झालेली दुखापत, अंतर्गत रक्तस्राव तसेच अन्य तातडीच्या वैद्यकीय परिस्थितीत रुग्णांची मोठी गैरसोय होत होती. आवश्यक तपासणीसाठी रुग्णांना खासगी केंद्रांकडे धाव घ्यावी लागत होती.

त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत होता. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने अमीन अ. करीम पटेल यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा शासकीय रुग्णालय प्रशासनाकडे निवेदन देण्यात आले होते.

लोंढे नाल्याजवळ गतिरोधकासाठी आमदार राम भदाणे यांचे निर्देश



जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: नागपूर-सुरत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वरील लोंढे नाल्याजवळ झालेल्या भीषण अपघातानंतर संतप्त ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन केल्याने महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली. या घटनेची माहिती मिळताच धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत ग्रामस्थांशी चर्चा केली. त्यानंतर आंदोलन शांत करण्यात आले असून वाहतूक सुरळीत करण्यात आली. आज दुपारी लोंढे नाल्याजवळ भरधाव वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. या मार्गावर वारंवार अपघात होत असल्याने संतप्त ग्रामस्थांनी महामार्गावर रास्ता रोको करत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. घटनेची माहिती मिळताच आमदार राम भदाणे यांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थितीची पाहणी केली. जखमी व्यक्तीस तातडीने वैद्यकीय उपचार मिळावेत यासाठी रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्यात आली आणि जखमीला जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. नागपूर-सुरत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वरील लोंढे नाल्याजवळ झालेल्या भीषण अपघातानंतर संतप्त ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन केल्याने महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली. या घटनेची माहिती मिळताच धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत ग्रामस्थांशी चर्चा केली. त्यानंतर आंदोलन शांत करण्यात आले असून वाहतूक सुरळीत करण्यात आली. आज दुपारी लोंढे नाल्याजवळ भरधाव वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.

"शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ देणार नाही"

शिंदेंचा परभणीतून विश्वास 'सेवा संकल्प अभियानाचा' शुभारंभ;

जन सम्राट टाईम्स

परभणी । प्रतिनिधी: नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या सेवापूर्तीचे औचित्य साधून 'सेवा संकल्प अभियानाचा' शुभारंभ परभणीच्या भूमीतून करण्यात आला. शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात दुष्काळग्रस्त व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना प्रत्यक्ष मदतीचा हात देण्यात आला. मराठवाड्यासह परभणी जिल्हा दुष्काळाच्या संकटाला सामोरा जात असताना केवळ आश्वासनांपुरते मर्यादित न राहता संकटग्रस्त कुटुंबांना प्रत्यक्ष मदत करण्याचा संकल्प या अभियानातून करण्यात आल्याचे शिंदे यांनी सांगितले. शेतकरी कुटुंबांना मदत; मुलींना सायकली कार्यक्रमात प्रातिनिधिक स्वरूपात दुष्काळग्रस्त व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शिलाई मशीन, तर गरजू मुलींना सायकलींचे वाटप करण्यात आले.

यामुळे संकटग्रस्त कुटुंबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात आला. याच कार्यक्रमात मराठवाड्यातील गरजू रुग्णांच्या सेवेसाठी २५ रुग्णवाहिकांचे लोकार्पण करण्यात आले. परभणीच्या



विकासासाठी १२० कोटींचा निधी परभणीच्या विकासासाठी यापूर्वी १२० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याचे शिंदे यांनी सांगितले. जिल्ह्यातील विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी सकारात्मक सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली. परभणीत उद्योगधंद्यांना चालना मिळावी यासाठी उद्योगमंत्री उदय सामंत यांना यापूर्वीच सूचना केल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी शिंदे म्हणाले, "सरकारी तिजोरी ही शेतकऱ्यांची आहे. शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ देणार नाही." संकटग्रस्त कुटुंबांशी साधला संवाद दुष्काळ आणि आत्महत्येमुळे संकटात सापडलेल्या कुटुंबांतील महिला व तरुणींशी शिंदे यांनी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. "मी तुमच्या सोबत आहे, काळजी करू नका," असा विश्वास त्यांनी यावेळी दिला. शासन आणि शिवसेना संकटाच्या काळात या कुटुंबांच्या पाठीशी उभी राहील, असेही त्यांनी सांगितले. हजारो नागरिकांची उपस्थिती कार्यक्रमाला परभणी जिल्ह्यातील शेतकरी, कष्टकरी, पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांच्या सहभागामुळे 'सेवा संकल्प अभियानाला' मोठा प्रतिसाद मिळाल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले. नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या सेवापूर्तीचे औचित्य साधून 'सेवा संकल्प अभियानाचा' शुभारंभ परभणीच्या भूमीतून करण्यात आला. शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात दुष्काळग्रस्त व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना प्रत्यक्ष मदतीचा हात देण्यात आला.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

FDA पथकासमोरच प्लॅस्टिक जाळून चूल पेटवली!

कारवाईच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह;तक्रारीच्या अनुषंगाने कारवाई सुरू असतानाच प्रकार;

जन सम्राट टाईम्स

भुसावळ। प्रतिनिधी: अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाचे पथक तक्रारीच्या अनुषंगाने कारवाईसाठी भुसावळ येथे दाखल झाले असतानाच, संबंधित ठिकाणी अन्न शिजवण्यासाठी प्लॅस्टिक जाळून चूल पेटवण्याचा प्रकार अधिकाऱ्यांच्या उपस्थितीतच सुरू असल्याचे समोर आले. विशेष म्हणजे, तक्रारदारासमोर आणि प्रशासनाचे पथक घटनास्थळी असतानाही हा प्रकार सुरू असल्याने कारवाईच्या पद्धतीवर आणि पुढील कायदेशीर कार्यवाहीबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. कारवाई सुरू असतानाच प्लॅस्टिक जाळल्याचा आरोप मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित ठिकाणी एका तक्रारीच्या अनुषंगाने FDAचे पथक कारवाईसाठी पोहोचले होते. पथकाची पाहणी व कार्यवाही सुरू असतानाच त्याच परिसरात चूल पेटवून अन्न शिजवण्याची तयारी सुरू होती. यावेळी लाकूड किंवा अन्य पारंपरिक इंधनाऐवजी प्लॅस्टिकच्या वस्तू जाळून त्याचा वापर केला जात असल्याचे तक्रारदाराच्या निदर्शनास आले, असा दावा आहे. प्लॅस्टिक जाळल्यामुळे धूर व घातक घटक निर्माण होण्याची शक्यता असल्याने, अन्न शिजवण्याच्या प्रक्रियेत अशा प्रकारचा वापर झाल्यास त्याची आरोग्याच्या दृष्टीनेही गंभीर दखल घेणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तक्रारदारासमोरच नियमभंग? संपूर्ण प्रकरणाची तक्रार करणारे तक्रारदार स्वतः घटनास्थळी उपस्थित असल्याचे सांगण्यात येते. त्यांच्या तक्रारीवरून प्रशासनाचे पथक कारवाई करत असतानाच संबंधित



ठिकाणी प्लॅस्टिक जाळण्याचा प्रकार सुरू असल्याचे त्यांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्याचा दावा आहे. मात्र, या प्रकाराची अधिकाऱ्यांनी नेमकी कोणती नोंद केली? संबंधित साहित्य जप्त केले का? पंचनामा किंवा स्वतंत्र अहवाल तयार करण्यात आला का? तसेच पर्यावरण व सार्वजनिक आरोग्याशी संबंधित नियमांनुसार कोणती कार्यवाही करण्यात आली, याबाबत स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. 'केवळ ताकीद'वर प्रकरण थांबले? या प्रकाराबाबत केवळ तोंडी ताकीद देण्यात आल्याची चर्चा स्थानिक पातळीवर सुरू आहे. मात्र, याची अधिकृत पुष्टी अद्याप स्पष्ट झालेली नाही. जर अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष प्लॅस्टिक जाळल्याचे निदर्शनास आले असेल, तर त्याची नोंद अधिकृत कारवाईत करण्यात आली का, संबंधितांना लेखी सूचना देण्यात आली का आणि लागू असलेल्या नियमांनुसार पुढील कार्यवाही करण्यात आली का, याबाबत प्रशासनाने स्पष्टता देणे आवश्यक आहे. त्यामुळे 'ताकीद' देऊन प्रकरण संपवण्यात आले असेल, तर त्यामागील कायदेशीर आधार काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. कारवाईच्या पारदर्शकतेची कसोटी एका बाजूला प्रशासनाकडून नियमभंगाविरोधात कारवाई केली जात असल्याचे सांगितले जाते; तर दुसऱ्या बाजूला कारवाई सुरू असतानाच अधिकाऱ्यांसमोर कथित नियमभंगाचा प्रकार घडल्याचे समोर येत असल्याने कारवाईच्या पद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रकरणात कोणतीही तडजोड झाली आहे किंवा अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक नरमाई दाखवली आहे, असा निष्कर्ष काढण्यापूर्वी घटनास्थळाचा पंचनामा, कारवाईची नोंद, अधिकाऱ्यांचा अहवाल आणि संबंधित कायदेशीर तरतुदींनुसार करण्यात आलेली कार्यवाही सार्वजनिक होणे आवश्यक आहे. उच्चाधिकाऱ्यांकडून चौकशीची मागणी या संपूर्ण प्रकाराची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतंत्रपणे चौकशी करावी, घटनास्थळी नेमके काय घडले याची नोंद तपासावी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी नियमानुसार कार्यवाही केली की नाही, याची पडताळणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तक्रारीवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या पथकासमोरच जर नियमभंग झाल्याचा आरोप असेल, तर 'कारवाई झाली का?' एवढाच प्रश्न महत्त्वाचा नसून 'कारवाई नेमकी कशी झाली?' हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे FDA प्रशासनाने या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट करून कारवाईची अधिकृत माहिती जाहीर करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाचे पथक तक्रारीच्या अनुषंगाने कारवाईसाठी भुसावळ येथे दाखल झाले असतानाच, संबंधित ठिकाणी अन्न शिजवण्यासाठी प्लॅस्टिक जाळून चूल पेटवण्याचा प्रकार अधिकाऱ्यांच्या उपस्थितीतच सुरू असल्याचे समोर आले. विशेष म्हणजे, तक्रारदारासमोर आणि प्रशासनाचे पथक घटनास्थळी असतानाही हा प्रकार सुरू असल्याने कारवाईच्या पद्धतीवर आणि पुढील कायदेशीर कार्यवाहीबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित ठिकाणी एका तक्रारीच्या अनुषंगाने FDAचे पथक कारवाईसाठी पोहोचले होते. पथकाची पाहणी व कार्यवाही सुरू असतानाच त्याच परिसरात चूल पेटवून अन्न शिजवण्याची तयारी सुरू होती. यावेळी लाकूड किंवा अन्य पारंपरिक इंधनाऐवजी प्लॅस्टिकच्या वस्तू जाळून त्याचा वापर केला जात असल्याचे तक्रारदाराच्या निदर्शनास आले, असा दावा आहे. प्लॅस्टिक जाळल्यामुळे धूर व घातक घटक निर्माण होण्याची शक्यता असल्याने, अन्न शिजवण्याच्या प्रक्रियेत अशा प्रकारचा वापर झाल्यास त्याची आरोग्याच्या दृष्टीनेही गंभीर दखल घेणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तक्रारदारासमोरच नियमभंग? संपूर्ण प्रकरणाची तक्रार करणारे तक्रारदार स्वतः घटनास्थळी उपस्थित असल्याचे सांगण्यात येते. त्यांच्या तक्रारीवरून प्रशासनाचे पथक कारवाई करत असतानाच संबंधित ठिकाणी प्लॅस्टिक जाळण्याचा प्रकार सुरू असल्याचे त्यांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्याचा दावा आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

पारोळा-एरंडोलमध्ये 'जलतारा'चा पायलट प्रकल्प!



जन सम्राट टाईम्स

टिटवी। प्रतिनिधी : महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांमध्ये जलसंधारण आणि जलसंवर्धनाच्या कामांना गती देण्यासाठी 'एक तालुका–एक जलतारा' या संकल्पनेवर आधारित 'जलतारा' प्रकल्पाचा पायलट प्रकल्प पारोळा-एरंडोल विधानसभा मतदारसंघात राबविण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून पुढे आलेल्या या प्रकल्पाची अंमलबजावणी आमदार ॲड. अमोल पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून गावनिहाय जलस्रोतांचा सखोल अभ्यास करून पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजना निश्चित केल्या जाणार आहेत. डॉ. अमोल शिंदे यांच्या मार्गदर्शन व समन्वयातून जलतारा टीम, आमदारांची स्थानिक टीम, ग्रामस्तरीय यंत्रणा, शेतकरी आणि ग्रामस्थ यांच्या सहभागातून प्रकल्पाचे नियोजन करण्यात येणार आहे. गावनिहाय जस्रोतांचा अभ्यास जलतारा टीमचे प्रमुख पुरुषोत्तम वायाळ आणि तज्ज्ञ टीमकडून प्रकल्पासाठी तांत्रिक मार्गदर्शन केले जाणार आहे. पायलट प्रकल्पांतर्गत संबंधित गावांमध्ये गावनिहाय सर्वेक्षण करण्यात येणार असून, उपलब्ध जलस्रोत, नाले, पाण्याचा नैसर्गिक प्रवाह तसेच जलसंधारणासाठी संभाव्य ठिकाणांची पाहणी केली जाणार आहे. शेतकरी आणि ग्रामस्थांच्या सहभागातून जलसंधारणासाठी योग्य ठिकाणांची प्राथमिक निवड केली जाईल. त्यानंतर तांत्रिक पाहणी करून संबंधित ठिकाणी 'जलतारा पॉइंट' निश्चित करण्यात येणार आहेत. या पॉइंटची GPS पद्धतीने नोंदणी करून आवश्यकतेनुसार जेसीबी तसेच अन्य यंत्रसामग्रीच्या माध्यमातून जलसंधारणाची कामे हाती घेतली जाणार आहेत. १२ गावांचा पायलट प्रकल्पात समावेश या पायलट प्रकल्पात पारोळा तालुक्यातील मेहू,टेहू,वाघरा-वाघरी आणि धुळपिंप्री या चार गावांचा समावेश करण्यात आला आहे. एरंडोल तालुक्यातील उमरे, मालखेडा, टोळी खुर्द आणि खडकेसीम या चार गावांचा, तर भडगाव तालुक्यातील आंचळगाव, धोत्रे, तळबंद तांडा आणि वसंतवाडी या चार गावांचा समावेश आहे. अशा प्रकारे एकूण १२ गावांमध्ये जलसंधारणाच्या संभाव्य कामांचे सर्वेक्षण, तांत्रिक अभ्यास आणि नियोजन केले जाणार आहे. जलसाठवण क्षमता वाढविण्यावर भर दुष्काळी परिस्थितीत पाण्याचे प्रभावी नियोजन आणि उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन हा 'जलतारा' प्रकल्पाचा केंद्रबिंदू राहणार आहे. जलसाठवण क्षमता वाढविणे, पावसाचे पाणी अडविणे, भूजल पुनर्भरणाला चालना देणे आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढविणे, या प्रमुख उद्दिष्टांवर प्रकल्पाच्या माध्यमातून भर दिला जाणार आहे.

नांदगावच्या सोनाली पठाडेची राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड!

विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत तंत्रशुद्ध खेळाचे प्रदर्शन

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद, । प्रतिनिधी : येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची इयत्ता बारावी कला शाखेतील विद्यार्थिनी कु. सोनाली दीपक पठाडे हिची शालेय राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे नांदगाव महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी हिरावाडी, नाशिक येथील विभागीय क्रीडा संकुलात विभागीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नांदगाव महाविद्यालयाच्या पाच विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. या स्पर्धेत सोनाली पठाडे हिने चपळ हालचाली, तंत्रशुद्ध खेळ आणि उत्कृष्ट बॉक्सिंग कौशल्याचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांवर प्रभावी वर्चस्व मिळविले. तिच्या दमदार कामगिरीच्या जोरावर तिने राज्यस्तरीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले.



सोनालीच्या या यशाबद्दल संस्थेचे संचालक अमित बोरसे पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. यू. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय मराठे, उपप्राचार्य डी. एम. राठोड, कला व वाणिज्य विभागप्रमुख जी. व्ही. बोरसे, विज्ञान विभागप्रमुख पी. एन. जपे तसेच महाविद्यालयातील सर्व ज्येष्ठ शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी तिचे अभिनंदन केले. आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा देण्यात आल्या. सोनालीला या यशासाठी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डी. एम. राठोड, क्रीडा संचालक लोकेश गळदगे आणि क्रीडा सहाय्यक दिलीप अहिरराव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सोनालीच्या राज्यस्तरीय निवडीमुळे नांदगाव शहरासह संपूर्ण तालुक्यात तिचे कौतुक होत असून, आगामी स्पर्धेतही ती उल्लेखनीय कामगिरी करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची इयत्ता बारावी कला शाखेतील विद्यार्थिनी कु. सोनाली दीपक पठाडे हिची शालेय राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.एक मानाचा तुरा रोवला गेला आहे नाशिक येथील विभागीय क्रीडा संकुलात विभागीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नांदगाव महाविद्यालयाच्या पाच विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. या स्पर्धेत सोनाली पठाडे हिने चपळ हालचाली, तंत्रशुद्ध खेळ आणि उत्कृष्ट बॉक्सिंग कौशल्याचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांवर प्रभावी वर्चस्व मिळविले. तिच्या दमदार कामगिरीच्या जोरावर तिने राज्यस्तरीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले.

मैत्रेय गुंतवणूकदारांचा डेटा पुन्हा जमा करण्याची गरज नाही!

जन सम्राट टाईम्स

जळगाव । (प्रतिनिधी): मैत्रेय गुंतवणूकदारांच्या कागदपत्रांबाबत निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मैत्रेय असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी जळगाव आर्थिक गुन्हे विभागातील संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी विभागाकडून देण्यात आलेल्या पेपर नोटीसच्या अनुषंगाने असोसिएशनच्या वतीने निवेदन देण्यात आले. असोसिएशनच्या म्हणण्यानुसार, मैत्रेय गुंतवणूकदारांचा आवश्यक डेटा यापूर्वीच असोसिएशनच्या माध्यमातून संबंधित विभागाकडे जमा करण्यात आलेला आहे. त्यामुळे आता प्रतिनिधी आणि ग्राहकांना पुन्हा त्याच कागदपत्रांसाठी त्रास होऊ नये, यासाठी पूर्वी जमा केलेला डेटा परस्पर वर्ग करून घ्यावा, अशी विनंती संबंधित अधिकाऱ्यांकडे करण्यात आली. विशेषतः १० ऑक्टोबर रोजी प्रतिनिधींकडून पुन्हा कागदपत्रे जमा करून घेण्याची आवश्यकता भासू नये, अशी मागणी असोसिएशनने केली आहे. यापूर्वीच संपूर्ण जिल्ह्याचा डेटा संकलित करून संबंधित विभागाकडे



जमा करण्यात आला असल्याचा दावा असोसिएशनने केला आहे. असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, जळगाव जिल्ह्यातील गुंतवणूकदारांचा संपूर्ण डेटा संबंधित विभागाकडे यापूर्वीच सादर करण्यात आला असून, तो मुंबई येथील संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचला आहे, याचीही असोसिएशनने खात्री केली आहे. त्यामुळे उपलब्ध असलेला डेटा संबंधित यंत्रणांनी परस्पर वापरात आणून गुंतवणूकदार, प्रतिनिधी आणि ग्राहकांना पुन्हा कागदपत्रे जमा करण्यासाठी होणारा त्रास टाळावा, अशी भूमिका असोसिएशनने मांडली आहे. दरम्यान, आर्थिक गुन्हे विभागाकडून या निवेदनावर आणि असोसिएशनच्या मागणीवर काय निर्णय घेतला जातो, याकडे मैत्रेय गुंतवणूकदारांचे लक्ष लागले आहे. मैत्रेय गुंतवणूकदारांच्या कागदपत्रांबाबत निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मैत्रेय असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी जळगाव आर्थिक गुन्हे विभागातील संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. अनुषंगाने असोसिएशनच्या वतीने निवेदन देण्यात आले. असोसिएशनच्या म्हणण्यानुसार, मैत्रेय गुंतवणूकदारांचा आवश्यक डेटा यापूर्वीच असोसिएशनच्या माध्यमातून संबंधित विभागाकडे जमा करण्यात आलेला आहे. त्यामुळे आता प्रतिनिधी आणि ग्राहकांना पुन्हा त्याच कागदपत्रांसाठी त्रास होऊ नये, यासाठी पूर्वी जमा केलेला डेटा परस्पर वर्ग करून घ्यावा, अशी विनंती संबंधित अधिकाऱ्यांकडे करण्यात आली.

नांदगाव अंडरपास दुरुस्तीमुळे वाहतुकीचा बोजवारा!

जन सम्राट टाईम्स

नांदगाव । प्रतिनिधी: नांदगाव रेल्वे अंडरपासच्या दुरुस्तीचे काम सुरू झाल्याने शहरातील वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनला आहे. अंडरपासमधून वाहतूक बंद करून पर्यायी मार्गावर वळविण्यात आलेली वाहतूक खड्डेमय आणि अरुंद रस्त्यामुळे धोकादायक ठरत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. वाहनचालकांसह विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची मोठी गैरसोय होत असून, रेल्वे प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नांदगाव तालुकाप्रमुख संतोष मधुकर गुप्ता यांनी निवेदनाद्वारे केली आहे. अंडरपासच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यापूर्वी रेल्वे प्रशासनाने नागरिकांना पुरेशी पूर्वसूचना दिली नाही तसेच वाहतुकीसाठी सक्षम पर्यायी व्यवस्था करण्यात आली नसल्याचे गुप्ता यांनी निवेदनात नमूद केले आहे. अंडरपासच्या दुरुस्तीचे काम १० ऑक्टोबर २०२६पर्यंत सुरू राहणार असल्याने या काळात वाहतूक नदीपात्रातील



रेल्वे पुलाच्या मार्गाने वळविण्यात आली आहे. पर्यायी मार्गावर खड्डे; वाहतुकीचा ताण वाढला रेल्वे पुलाच्या पर्यायी मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून रस्ता अरुंद असल्याने वाहनांची कोंडी आणि अपघाताचा धोका निर्माण झाल्याचे निवेदनात म्हटले आहे. अंडरपास बंद असल्याने या मार्गावरील वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात वाढला असून, मार्गाची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक असल्याची मागणी करण्यात आली आहे. पर्यायी मार्गाची योग्य व्यवस्था नसल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पर्यायी मार्गावर वाढलेल्या वाहतुकीमुळे विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याचा दावा निवेदनातून करण्यात आला आहे. अरुंद रस्ता, वाढलेली वाहनांची संख्या आणि रस्त्याची खराब अवस्था यामुळे अपघाताची शक्यता वाढल्याचे गुप्ता यांनी म्हटले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार करून रेल्वे प्रशासनाने पर्यायी मार्गाची तातडीने डागडुजी करावी, वाहतुकीचे योग्य नियोजन करावे तसेच आवश्यक त्या ठिकाणी सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. 'वारंवार कळवूनही उपाययोजना नाही' या समस्येबाबत रेल्वे प्रशासनाला वारंवार माहिती देऊनही अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचा आरोप संतोष गुप्ता यांनी केला आहे. परिस्थितीवर वेळीच उपाययोजना न झाल्यास गंभीर घटना घडण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

अक्राणी-बिलगाव वनविभागाची धडक कारवाई

सागवान लाकडासह बोलेरो पिकअप जप्त ३ लाख १२ हजार ६९४ रुपयांचा मुद्देमाल ताब्यात

जन सम्राट टाईम्स

धडगाव । प्रतिनिधी: नंदुरबार जिल्ह्यातील अक्राणी आणि बिलगाव वनविभागाच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत बेकायदेशीर सागवान लाकडाची वाहतूक करणारी बोलेरो पिकअप जप्त केली. या कारवाईत सागवान लाकडासह एकूण ३ लाख १२ हजार ६९४ रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. वनपथकाची चाहूल लागताच वाहन चालक व त्याचे साथीदार अंधाराचा फायदा घेत जंगलात पसार झाले. ८ ऑक्टोबर २०२६ रोजी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार बिलगाव (प्रा.) आणि अक्राणी (प्रा.) वनक्षेत्रातील वनक्षेत्रपाल व रेंज स्टाफचे पथक पहाटे दोन ते अडीच वाजेच्या सुमारास साव-या-भमाणा रस्त्यावर गस्त घालत होते. यावेळी एक संशयास्पद बोलेरो पिकअप (क्र. एमएच ३९ सी ६६३६) भरधाव वेगाने येताना पथकाच्या निदर्शनास आली. शासकीय वाहन व वनकर्मचाऱ्यांची चाहूल लागताच चालकाने वाहन रस्त्यातच थांबवले. त्यानंतर अंधार आणि घनदाट जंगलाचा फायदा घेत चालक व त्याचे साथीदार वाहन सोडून जंगलात पसार झाले. वनपथकाने परिसरात शोधमोहीम राबविली; मात्र अंधारामुळे संशयितांचा ठावठिकाणा लागला नाही.११४ नग सागवान चौकटी जप्त पंचांसमक्ष आणि नियमानुसार वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर सागवान लाकूड आढळून आले. वाहनातून ११४ नग सागवान चौकटी, एकूण



१३.६४५ घनमीटर, जप्त करण्यात आल्या. या लाकडाची किंमत ३७ हजार ६९४ रुपये, तर बोलेरो पिकअपची किंमत २ लाख ७५ हजार रुपये असल्याचे वनविभागाने नमूद केले आहे. अशा प्रकारे लाकूड व वाहन असा एकूण ३ लाख १२ हजार ६९४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त केलेले वाहन आणि सागवान लाकूड धडगाव टिंबर डेपो येथे ताबा पावतीने सुरक्षित जमा करण्यात आले आहे. वनगुन्हा दाखल; तपास सुरू या प्रकरणी साव-या येथील वनरक्षकांनी वनगुन्हा क्रमांक ०८/२०२६, दिनांक ८ ऑक्टोबर २०२६ अन्वये भारतीय वन अधिनियम १९२७ मधील कलम २६(१) अ, फ, २६(१ए) ए, ४१(१), ४२ आणि ५२(१) नुसार वनगुन्हा नोंदविला आहे. प्रकरणाचा पुढील तपास वनपाल भरतसिंग परदेशी करीत आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई ही कारवाई वनसंरक्षक, वनवृत्त धुळे निनु सोमराज, उपवनसंरक्षक नंदुरबार संतोष सस्ते, विभागीय दक्षता अधिकारी वनवृत्त धुळे राजेंद्र सदगिर आणि सहाय्यक वनसंरक्षक, अक्राणी रोशन बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. मोहिमेचे नेतृत्व बिलगाव (प्रा.)चे वनक्षेत्रपाल लक्ष्मीकांत शेंडगे आणि अक्राणीचे वनक्षेत्रपाल रोहन पाटील यांनी केले. कारवाईत वनपाल भरतसिंग परदेशी, सिद्धार्थ बैसाणे, तसेच वनरक्षक पवन पाडवी, उमेश पावरा, अरविंद निकम, दिलवरसिंग पावरा, अमरसिंग पावरा, दिनेश वसावे आणि वाहनचालक हेमंत पावरा सहभागी झाले. वनविभागाच्या या कारवाईमुळे बेकायदेशीर सागवान वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी वनपथकांची गस्त आणि कारवाई अधिक तीव्र करण्यात आल्याचे चित्र आहे.नंदुरबार जिल्ह्यातील अक्राणी आणि बिलगाव वनविभागाच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत बेकायदेशीर सागवान लाकडाची वाहतूक करणारी बोलेरो पिकअप जप्त केली. या कारवाईत सागवान लाकडासह एकूण ३ लाख १२ हजार ६९४ रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. वनपथकाची चाहूल लागताच वाहन चालक व त्याचे साथीदार अंधाराचा फायदा घेत जंगलात पसार झाले.

नशिराबादमध्ये विहिरीत कुजलेल्या अवस्थेत मृतदेह

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद। प्रतिनिधी: तालुक्यातील नशिराबाद येथील जुन्या जीन परिसरातील शेतातील विहिरीत गुरुवारी (८ ऑक्टोबर) सकाळी एका व्यक्तीचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. मृत व्यक्तीची ओळख बंडू रामराव पाटील (वय ४०, रा. इंदिरानगर, आसोदा) अशी पटली आहे. त्यांच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून नशिराबाद पोलिसांकडून तपास सुरू आहे. नशिराबाद येथील जुन्या जीनजवळ धीरज भगवान पाटील यांचे शेत आहे. गुरुवारी सकाळी शेतातील विहिरीत मृतदेह तरंगताना आढळून आला. हा प्रकार लक्षात येताच शेतमालक धीरज पाटील यांनी तत्काळ नशिराबाद पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. आवश्यक कार्यवाही केल्यानंतर विहिरीतून मृतदेह बाहेर काढण्यात आला. मृत व्यक्तीजवळ आढळलेल्या आधारकार्डाच्या आधारे पोलिसांनी त्यांची ओळख पटवली. बंडू पाटील हे आसोदा येथील इंदिरानगर परिसरातील रहिवासी असल्याचे स्पष्ट झाले. तालुक्यातील नशिराबाद येथील जुन्या जीन परिसरातील शेतातील विहिरीत गुरुवारी (८ ऑक्टोबर) सकाळी एका व्यक्तीचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. मृत व्यक्तीची ओळख बंडू रामराव पाटील (वय ४०, रा. इंदिरानगर, आसोदा) अशी पटली आहे. त्यांच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून नशिराबाद पोलिसांकडून तपास सुरू आहे. नशिराबाद येथील जुन्या जीनजवळ धीरज भगवान पाटील यांचे शेत आहे.

अवैध धंद्यांवर कारवाई; मात्र ‘जबाबदार कोण?’चा सवाल कायम!

मनपाच्या जागेपासून शहरातील विविध भागांपर्यंत अवैध धंदे सुरू असताना संबंधित यंत्रणा नेमकी काय करत होती?

जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी: शहरातील अवैध धंद्यांविरोधात गेल्या काही काळापासून विविध स्तरांवर आंदोलने, निवेदने, तक्रारी आणि सातत्याने पाठपुरावा सुरू असताना अखेर पोलीस प्रशासनाकडून काही ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईचे स्वागत होत असले, तरी त्याचवेळी ‘हे अवैध धंदे इतके दिवस सुरू कसे होते आणि संबंधित यंत्रणांना त्याची माहिती का मिळाली नाही?’ असा गंभीर सवाल आता उपस्थित होत आहे. अवैध धंद्यांविरोधात यापूर्वीही अनेकदा आंदोलने झाली. मात्र, या आंदोलनांचा आवाज प्रशासनाच्या पातळीवर अपेक्षित तीव्रतेने पोहोचत नसल्याची भावना व्यक्त होत होती. अशा परिस्थितीत भीम आर्मीने आंदोलनाची धार कायम ठेवत हा प्रश्न सातत्याने प्रशासनासमोर लावून धरला.

निवेदने, आंदोलने आणि पाठपुराव्यामुळे अखेर काही ठिकाणी अवैध धंद्यांविरोधात कारवाई सुरू झाल्याचे चित्र आहे. भीम आर्मीचे महाराष्ट्र उपाध्यक्ष तथा उत्तर महाराष्ट्र प्रभारी पँथर राहुल वाघ, जिल्हाध्यक्ष सागर चव्हाण आणि सचिन खरात यांनी या कारवाईचे स्वागत करून धुळे महानगरपालिका आणि जिल्हा पोलीस प्रशासनाचे आभार मानले आहेत. तसेच, अवैध धंद्यांविरोधातील कारवाई यापुढेही सातत्याने सुरू ठेवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.



मनपाच्या जागेवर धंदे सुरू होते, तर ‘जबाबदार कोण?’ मात्र, कारवाईनंतर आता काही मूलभूत प्रश्न ऐरणीवर आले आहेत. धुळे महानगरपालिकेच्या व्यापारी संकुलात किंवा मनपाच्या अतिक्रमित जागेवर अवैध धंदे सुरू होते, तर ते नेमके कोणाच्या मर्जीने सुरू होते? संबंधित विभागाला याची माहिती नव्हती का? माहिती होती, तर वेळेत कारवाई का झाली नाही? आणि माहिती नव्हती, तर नियमित पाहणी व नियंत्रण यंत्रणा नेमकी काय करत होती? केवळ कारवाई झाल्याचे दाखवून प्रकरण संपवण्याऐवजी, संबंधित ठिकाणी अवैध धंदे सुरू राहण्यामागील प्रशासकीय त्रुटी शोधणे गरजेचे असल्याची मागणी होत आहे. बीट यंत्रणेलाही माहिती नव्हती का? शहरातील ज्या-ज्या भागांमध्ये अवैध धंद्यांवर कारवाई करण्यात आली, त्या परिसरातील स्थानिक बीट मार्शल किंवा संबंधित पोलीस यंत्रणेला याची माहिती होती का? त्यांच्या दप्तरात किंवा संबंधित नोंदींमध्ये या अवैध धंद्यांचा उल्लेख होता का, याचीही चौकशी होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. जर माहिती होती, तर वेळेत कारवाई का झाली नाही? आणि माहितीच नव्हती, तर बीट यंत्रणेची कार्यपद्धती, गस्त आणि स्थानिक पातळीवरील माहिती संकलन याबाबतही प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

त्यामुळे आता केवळ अवैध धंद्यांवर कारवाई करून थांबण्याऐवजी, हे धंदे इतके दिवस सुरू राहण्यामागे प्रशासनाच्या कोणत्या पातळीवर त्रुटी राहिल्या, याची जबाबदारी निश्चित होणार का? हा खरा सवाल आहे. गरिब हातगाडी व्यावसायिकांनाही न्याय मिळावा दरम्यान, पँथर राहुल वाघ यांनी अवैध धंद्यांवरील कारवाईचे स्वागत करतानाच गरीब हातगाडी व्यावसायिकांनाही न्याय मिळावा, अशी मागणी केली आहे. धुळे महानगरपालिका हद्दीतील अनेक छोटे-मोठे हातगाडी व्यावसायिक आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी व्यवसाय करतात. अशा व्यावसायिकांकडून अतिक्रमणाच्या नावाखाली दरमहा ७०० रुपये मनपा कर आकारण्याऐवजी, त्यांना नियमबद्ध पद्धतीने व्यवसाय करण्याची परवानगी व निश्चित जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. एकीकडे अवैध धंद्यांवर कठोर कारवाई आणि दुसरीकडे प्रामाणिकपणे उदरनिर्वाह करणाऱ्या छोट्या व्यावसायिकांना संरक्षण—या दोन्ही बाबींमध्ये प्रशासनाने संतुलित आणि जनहिताची भूमिका घेणे गरजेचे आहे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. कारवाईच्या सातत्याचीच खरी कसोटी अवैध धंद्यांवर झालेली कारवाई ही स्वागतार्ह असली, तरी आता तिच्या सातत्याची खरी परीक्षा आहे.

ही मोहीम काही दिवसांपुरती मर्यादित राहणार की अवैध धंद्यांविरोधात कायमस्वरूपी प्रभावी यंत्रणा उभी राहणार, हा प्रश्न धुळेकरांसमोर आहे. त्याचबरोबर आतापर्यंत अवैध धंदे सुरू राहण्यास कारणीभूत ठरलेल्या प्रशासकीय त्रुटींची चौकशी करून जबाबदारी निश्चित केली जाणार का? संबंधित विभागांच्या नियंत्रण यंत्रणांचे मूल्यमापन होणार का? याची उत्तरेही प्रशासनाने स्पष्ट करणे अपेक्षित आहे. कारवाई झाली, हा एक टप्पा झाला; मात्र अवैध धंद्यांना आळा घालणे, त्यांची पुनरावृत्ती रोखणे आणि निष्काळजीपणाची जबाबदारी निश्चित करणे—हीच पुढील खरी परीक्षा ठरणार आहे. शहरातील अवैध धंद्यांविरोधात गेल्या काही काळापासून विविध स्तरांवर आंदोलने, निवेदने, तक्रारी आणि सातत्याने पाठपुरावा सुरू असताना अखेर पोलीस प्रशासनाकडून काही ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईचे स्वागत होत असले, तरी त्याचवेळी ‘हे अवैध धंदे इतके दिवस सुरू कसे होते आणि संबंधित यंत्रणांना त्याची माहिती का मिळाली नाही?’ असा गंभीर सवाल आता उपस्थित होत आहे. अवैध धंद्यांविरोधात यापूर्वीही अनेकदा आंदोलने झाली.

मात्र, या आंदोलनांचा आवाज प्रशासनाच्या पातळीवर अपेक्षित तीव्रतेने पोहोचत नसल्याची भावना व्यक्त होत होती. अशा परिस्थितीत भीम आर्मीने आंदोलनाची धार कायम ठेवत हा प्रश्न सातत्याने प्रशासनासमोर लावून धरला. निवेदने, आंदोलने आणि पाठपुराव्यामुळे अखेर काही ठिकाणी अवैध धंद्यांविरोधात कारवाई सुरू झाल्याचे चित्र आहे. भीम आर्मीचे महाराष्ट्र उपाध्यक्ष तथा उत्तर महाराष्ट्र प्रभारी पँथर राहुल वाघ, जिल्हाध्यक्ष सागर चव्हाण आणि सचिन खरात यांनी या कारवाईचे स्वागत करून धुळे महानगरपालिका आणि जिल्हा पोलीस प्रशासनाचे आभार मानले आहेत.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

येवती ग्रामपंचायतीवर शिवसेनेचा भगवा!



जन सम्राट टाईम्स

मुक्ताईनगर । प्रतिनिधी : मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघात शिवसेनेच्या संघटनात्मक विस्ताराला आणखी एक बळ मिळाले असून, बोदवड तालुक्यातील येवती ग्रामपंचायतीच्या सहा सदस्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. आमदार चंद्रकांत भाऊ पाटील यांच्या नेतृत्वावर तसेच मुक्ताईनगर विधानसभा क्षेत्रप्रमुख प्रा. हितेश दादा पाटील यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास व्यक्त करत या सदस्यांनी शिवसेनेचा भगवा हाती घेतला. मतदारसंघात सुरू असलेल्या विकासकामांना आणि संघटनात्मक उपक्रमांना प्रतिसाद देत हा पक्षप्रवेश झाल्याचे यावेळी सांगण्यात आले. या पक्षप्रवेशामुळे येवती परिसरात शिवसेनेच्या स्थानिक संघटनेला बळ मिळाल्याचे पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

शिवसेनेत प्रवेश करणाऱ्या सदस्यांमध्ये शुभम गणेश पाटील, सौ. कविता सागर शेजोळे, शमीनाबी शेख अशपाक, फारुख नूर खान, सौ. केसरबाई शिवदास भिल आणि सौ. संगम दीपक म्हसाने यांचा समावेश आहे. आमदार चंद्रकांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघाच्या विकासाला गती देण्यासाठी प्रयत्न सुरू असून, त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून विविध स्तरांतील कार्यकर्ते आणि पदाधिकारी शिवसेनेशी जोडले जात असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. प्रा. हितेश पाटील यांच्या कार्यपद्धतीमुळेही संघटनात्मक पातळीवर कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती या पक्षप्रवेशावेळी येवती ग्रामपंचायत उपसरपंच दिनेश माळी, ग्रामपंचायत सदस्य गणेश सोनवणे, आशिष सोनवणे, डॉ. आनंद माळी, शेख अशपाक शेख हाफिस, मधूभाऊ शेजोळे यांच्यासह शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख छोटूभाऊ भोई, जिल्हासंघटक सुनीलभाऊ पाटील, युवासेना जिल्हाप्रमुख पंकजभाऊ राणे, अल्पसंख्यांक प्रदेश उपाध्यक्ष अफसरभाई खान, राजेंद्रभाऊ वानखेडे, नगराध्यक्ष दिनेश माळी, नगरसेवक सईद दादा बागवान, निलेश माळी, सुनील बोरसे, जफर शेख आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी नव्याने शिवसेनेत प्रवेश केलेल्या सर्व सदस्यांचे स्वागत करून त्यांच्या सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमास शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पारोळा शहरात अतिक्रमणांवर नगरपरिषदेचा हातोडा!

तुषार नेरकर यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाची कारवाई

जन सम्राट टाईम्स

पारोळा । प्रतिनिधी : पारोळा शहरातील सार्वजनिक रस्ते, फुटपाथ, नाले तसेच शासकीय व नगरपरिषदेच्या मालकीच्या जागांवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाने विशेष मोहीम राबविली. मुख्याधिकारी तुषार नेरकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष पथकाने शहरातील विविध भागांत कारवाई करत अतिक्रमणे हटविण्यावर भर दिला. ही मोहीम रात्री उशिरापर्यंत सुरू होती. या मोहिमेंतर्गत नियोजित स्टेडियम परिसर, बसस्थानक परिसर, कजगाव नाका, स्वर्गीय मीनाताई ठाकरे व्यापारी संकुल, पीर दरवाजा, राजीव गांधी नगर आणि इंदिरानगर परिसरातील पाण्याच्या टाकीजवळील अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली.

शहरातील सार्वजनिक जागा नागरिकांसाठी मोकळ्या ठेवणे, वाहतुकीची कोंडी कमी करणे, पादचाऱ्यांना सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देणे आणि सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश असल्याचे नगरपरिषद प्रशासनाने स्पष्ट केले. कायदेशीर प्रक्रियेनंतर अतिक्रमणे निष्कासित महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १७९ (१), (३), १८० व १८१ अन्वये अतिक्रमणांची पाहणी, नोंदणी आणि आवश्यक कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. संबंधित अतिक्रमणधारकांना नियमानुसार सूचना व नोटिसा देऊन कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर अतिक्रमणे हटविण्यात येत असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. मुख्य रस्ते, बाजारपेठा, सार्वजनिक मार्ग, फुटपाथ आणि नगरपरिषदेच्या मालकीच्या जागांवरील अतिक्रमणांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. रस्त्यांवर अनधिकृतपणे साहित्य, हातगाड्या, फलक, शेड, ओटे किंवा अन्य वस्तू ठेवून वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्यांनाही आवश्यक सूचना देण्यात आल्या. अतिक्रमणविरोधी कारवाई सातत्याने सुरू राहणार मुख्याधिकारी तुषार नेरकर म्हणाले, “शहरातील सार्वजनिक रस्ते आणि जागा या सर्व नागरिकांच्या सोयीसाठी आहेत. नागरिकांची सुरक्षितता, वाहतूक सुरळीत राहणे तसेच शहराचे सौंदर्य आणि शिस्त कायम राखण्यासाठी अतिक्रमणविरोधी कारवाई सातत्याने करण्यात येईल. नागरिकांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून नगरपरिषद प्रशासनाला सहकार्य करावे.” या कारवाईत स्थापत्य अभियंता सुमित पाटील, रचना सहाय्यक साक्षी मराठे, आस्थापना प्रमुख अनिल तिदमे, लेखापरीक्षक दीपक महाजन, अंतर्गत लेखापरीक्षक सार्थक मोरस्कर, पाणीपुरवठा अभियंता संकेत कारले, कर निरीक्षक तथा प्रशासन अधिकारी संजय गीते, संकीर्ण विभागाचे महेश जोशी, स्वच्छता निरीक्षक दिलीप चौधरी आणि सभा लिपिक किशोर गणपत चौधरी सहभागी झाले. तसेच संदीप बळीराम पाटील, परेश उत्तम चौते, गणेश माळी, राहुल प्रजापती, आकाश सौदागर, निर्भय मोरे, विश्वास पाटील यांच्यासह आरोग्य व पाणीपुरवठा विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मोहिमेत सहभाग घेतला.

किक बॉक्सिंगमध्ये भडगाव तालुक्याचा ‘पंच’; १८ पैकी १८ खेळाडूंना पदक!

जन सम्राट टाईम्स



भडगाव। (प्रतिनिधी): क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जळगाव येथे आयोजित जिल्हास्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेत भडगाव तालुक्यातील खेळाडूंनी दमदार कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. तालुक्यातून सहभागी झालेल्या १८ पैकी तब्बल १८ खेळाडूंनी पदक पटकावले, ही या कामगिरीची विशेष बाब ठरली. भडगाव तालुक्यातील खेळाडूंनी या स्पर्धेत १० सुवर्ण, ५ रौप्य आणि ३ कांस्यपदकांची कमाई केली. यातील सर्व १० सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंची आगामी विभागीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. १० खेळाडूंची सुवर्णझेप; विभागीय स्पर्धेसाठी निवड

१४ वर्षांखालील गट : शिव सतीश दाभाडे – सुवर्णपदक आर्यन निलेश ब्राह्मणकर – सुवर्णपदक अझहर शेख आयाज – सुवर्णपदक पायल रवींद्र धोबी – सुवर्णपदक समीक्षा किशोर भोई – सुवर्णपदक १९ वर्षांखालील गट : सादिया जाकीर कुरेशी खान – सुवर्णपदक शिफा फिरोज पिंजारी – सुवर्णपदक अफान शेख मोहिउद्दीन – सुवर्णपदक रेहान नाझी मिर्झा – सुवर्णपदक जिशान जाफर खान – सुवर्णपदक या सर्व १० सुवर्णपदक विजेत्यांची पुढील विभागीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. रौप्यपदकावर पाच खेळाडूंची मोहोर भडगाव तालुक्यातील पाच खेळाडूंनी रौप्यपदक पटकावत आपली गुणवत्ता सिद्ध केली. त्यामध्ये अली रियाज खाटीक, अबूबकर मोसिन खाटीक, शाहिद भिकन शेख, तहसील वसीम सय्यद आणि आर्यन जुलाल सोनवणे यांचा समावेश आहे. तीन खेळाडूंची कांस्यपदकाची कमाई जय सुनील अहिरे, जुनेद खान साकीर खान आणि सादिया पिंजारी यांनी कांस्यपदक पटकावत भडगावच्या पदकतालिकेत आणखी भर घातली. प्रशिक्षकांचे मार्गदर्शन ठरले महत्त्वाचे या सर्व यशस्वी खेळाडूंनी A.K. Warriors Karate Classचे प्रतिनिधित्व केले. खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक अबरार खान तसेच प्रशिक्षक शाहरुख मण्यार यांचे मार्गदर्शन लाभले. या यशासाठी संघटनेचे जिल्हाध्यक्ष हाजी जाकीर कुरेशी, उपाध्यक्ष श्याम पाटील, सौरभ देशमुख, सौरभ पाटील, संतोष पाटील, हाजी खालील शेख आणि अजगर खान यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. जिल्हास्तरीय स्पर्धेत भडगाव तालुक्यातील खेळाडूंनी केलेल्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या सर्व १० सुवर्णपदक विजेत्यांना पुढील स्पर्धेसाठी मान्यवर, प्रशिक्षक आणि क्रीडाप्रेमींकडून शुभेच्छा देण्यात आल्या.

विभागीय कुस्ती स्पर्धेत गो.पु. पाटील विद्यालयाचा डंका!

जन सम्राट टाईम्स

भडगाव : । प्रतिनिधी: येवला, जि. नाशिक येथे पार पडलेल्या नाशिक विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेत कर्मवीर तात्यासाहेब हरि रावजी पाटील किसान शिक्षण संस्था, भडगाव संचलित गोपीचंद पुना पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, कोळगावच्या कुस्तीपटूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. प्रेरणा गणेश पाटील आणि दिव्या भानुदास पाटील यांनी आपापल्या वजनी गटांत प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदक पटकावले, तर तनु वाल्मीक पाटील हिने उपविजेतेपद मिळवत रौप्यपदकाची कमाई केली. प्रेरणा आणि दिव्याची सुवर्णभरारी १९ वर्षांखालील मुलींच्या ५७ किलो वजनी गटात प्रेरणा गणेश पाटील हिने उत्कृष्ट कुस्तीचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली आणि विभागीय विजेतेपद मिळविले. या विजयामुळे तिची राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. १७ वर्षांखालील मुलींच्या ६९ किलो वजनी गटात दिव्या भानुदास पाटील हिने आक्रमक आणि आत्मविश्वासपूर्ण खेळ करत प्रथम क्रमांक पटकावला.



विभागीय स्पर्धेतील या यशामुळे दिव्यानेही राज्यस्तरीय स्पर्धेत प्रवेश निश्चित केला आहे. याच वयोगटातील ४९ किलो वजनी गटात तनु वाल्मीक पाटील हिने अंतिम फेरीपर्यंत मजल मारत उपविजेतेपद मिळविले. अंतिम सामन्यात विजयाने हुलकावणी दिली असली, तरी संपूर्ण स्पर्धेतील तिची कामगिरी कौतुकास्पद ठरली. जिल्हास्तरापासून विभागीय स्तरापर्यंत यशाची परंपरा विशेष म्हणजे, या तिन्ही खेळाडूंनी यापूर्वी जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून नाशिक विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली होती. विभागीय स्तरावरही त्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध करत विद्यालयाच्या क्रीडा परंपरेत मानाचा तुरा रोवला. या यशामागे पर्यवेक्षक तथा आदर्श क्रीडा शिक्षक बी. डी. साळुंखे, ज्येष्ठ शिक्षक प्रा. रघुनाथ अरविंद पाटील आणि राष्ट्रीय खो-खो पंच प्रा. प्रेमचंद चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंचा नियमित सराव, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि मेहनतीमुळे हे यश मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. यशस्वी कुस्तीपटूंचे अभिनंदन या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब प्रतापराव पाटील, संस्थेच्या उपाध्यक्षा डॉ. पुनमताई पाटील, मंत्रालयीन उपसचिव दादासाहेब प्रशांतराव पाटील, प्राचार्य आर. आर. वळखंडे, पर्यवेक्षक बी. डी. साळुंखे, मनोजकुमार पवार तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. प्रेरणा आणि दिव्या या दोन्ही सुवर्णपदक विजेत्या खेळाडू आता राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होणार असल्याने त्यांच्या कामगिरीकडे विद्यालयासह क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले

दहिवेलमध्ये अंगणवाडी सेविका व मदतनीसांचा सन्मान

‘आंगण का उत्सव’ उपक्रमातून २१ अंगणवाड्यांतील कर्मचाऱ्यांचा गौरव

जन सम्राट टाईम्स



धुळे, । प्रतिनिधी: सेवा सप्ताहानिमित्त ‘सेवा संकल्प अभियान’अंतर्गत ‘आंगण का उत्सव’ हा विशेष उपक्रम दहिवेल परिसरात उत्साहात राबविण्यात आला. दहिवेल, डाबरी, सडकपाडा, मैंदाणे, ओझरपाडा, किरवाडे, भोनगाव आणि सातरपाडा या गावांमधील एकूण २१ अंगणवाड्यांतील अंगणवाडी सेविका व मदतनीसांचा शाल व गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. बालकांचे संगोपन, पोषण, आरोग्य, शिक्षण आणि संस्कार यासाठी अंगणवाडी सेविका व मदतनीस सातत्याने कार्यरत असतात. त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी अंगणवाडीत येणाऱ्या चिमुकल्या बालकांना बिस्किट पुड्यांचे वाटप करण्यात आले. त्यामुळे बालकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. या कार्यक्रमाला धुळे जिल्हा भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष सौ. धरती निखिल देवरे यांच्यासह किरवाडे ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष मालचे, उपसरपंच सुनील मराठे, महिला मोर्चाच्या जिल्हा सरचिटणीस सौ. सुवर्णा अजगे, सौ. सुवर्णा काकुस्ते, महिला मोर्चाच्या सदस्या, अंगणवाडी सेविका व मदतनीस तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. जिल्ह्यात विविध ठिकाणी सेवा सप्ताहाचे उपक्रम भाजपा महिला मोर्चाच्या वतीने आयोजित या उपक्रमांना धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, आमदार अमरीश भाई पटेल यांचे मार्गदर्शन लाभत असल्याचे आयोजकांनी सांगितले. धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे, माजी आमदार कुणाल पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष रामकृष्ण खलाणे तसेच भाजपा पदाधिकारी यांच्या संयोजनातून जिल्ह्यात विविध ठिकाणी सेवा सप्ताहानिमित्त उपक्रम राबविण्यात येत आहेत. धुळे जिल्हा महिला मोर्चाच्या ग्रामीण भागातील पदाधिकारी, कार्यकर्ता आणि संघटन कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. ‘अंगणवाडी सेविकांचे योगदान अमूल्य’ यावेळी प्रतिक्रिया देताना भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष सौ. धरती निखिल देवरे म्हणाल्या, “बालकांचे संगोपन, पोषण, आरोग्य, शिक्षण आणि संस्कार यासाठी सातत्याने समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या अमूल्य योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शाल व गुलाबपुष्प देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. सेवा सप्ताहानिमित्त धुळे जिल्हा भाजपा महिला मोर्चाच्या वतीने जिल्ह्यात विविध कार्यक्रम घेण्यात आले असून, महिला मोर्चाच्या पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांनी त्यासाठी परिश्रम घेतले.”

या मान्यवरांची होती उपस्थिती

या कार्यक्रमाला धुळे जिल्हा भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष सौ. धरती निखिल देवरे यांच्यासह किरवाडे ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष मालचे, उपसरपंच सुनील मराठे, महिला मोर्चाच्या जिल्हा सरचिटणीस सौ. सुवर्णा अजगे, सौ. सुवर्णा काकुस्ते, महिला मोर्चाच्या सदस्या, अंगणवाडी सेविका व मदतनीस तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

अंजनविहिरे गावात डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी धूरफवारणी



जन सम्राट टाईम्स

भडगाव। प्रतिनिधी: : हिवताप, डेंग्यू आणि चिकनगुनियासारख्या डासांमुळे पसरणाऱ्या आजारांना आळा घालण्यासाठी अंजनविहिरे ग्रामपंचायतीच्या वतीने गावात धूरफवारणी करण्यात आली. मागील आठवड्यात गावात हिवतापसदृश लक्षणे असलेले रुग्ण आढळल्याने आरोग्य विभागाच्या सूचनेनुसार खबरदारीचा उपाय म्हणून ही मोहीम राबविण्यात आली. गावातील नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहावे आणि डासांचा प्रादुर्भाव कमी व्हावा, या उद्देशाने ग्रामपंचायतीने धूरफवारणीचे नियोजन केले. सरपंच चिंधा बाविस्कर, उपसरपंच प्रवीण बोरसे, ग्रामविकास अधिकारी आनंदा बोरसे, माजी सरपंच शशिकांत पाटील, माजी उपसरपंच प्रदीप पाटील आणि ग्रामपंचायत सदस्य संभाजी पाटील यांच्यासह सर्व ग्रामपंचायत सदस्यांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेतला.